# सायबर जनजागृती महिना धुळ्यातील डॉ पा.रा.घोगरे विज्ञान महाविद्यालयात संपन्न

• बाळकडू : सतिष पवार
संपर्क.९५२७७९९३०४

०६ धुळे ग्रामीण (धुळे):– श्री.शि.वि.प्र.संस्थेचे कै.कर्म.डॉ.पा.रा.घोगरे विज्ञान महाविद्यालयात संगणक शास्त्र विभाग व क्विक हील फाऊंडेशन पुणे व महाराष्ट्र सायबर सेल धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने ''सायबर जनजागृती महिना'' दिनांक ६-१०-२०२३ रोजी संपन्न झाला. त्यात २० सायबर योद्धा यांनी तीन वेगवेगळ्या नाटिका सायबर सुरक्षा बाबत सादर केल्या. संगणक शास्त्र विभाग व क्विक फाउंडेशन पुणे यांच्यात सामंजस्य करार झालेला आहे. त्या करारा अंतर्गत क्विक हील फाउंडेशनने २० विद्यार्थ्यांची '' सायबर योद्धा'' म्हणून निवड केली आहे .सध्याच्या युगात ऑनलाइन फ्रॉड, सायबर हॅकिंग, डेटा चोरी चे प्रमाण खूप वाढले आहे. त्यावर प्रतिबंध करण्यासाठी जनमानसात जागृती करणे फार आवश्यक आहे.याच उद्देशाने महाविद्यालयात विद्यार्थी तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासमोर नाटिका सादर करण्यात आल्या. प्रथम नाटिका ही फोटो मोर्फिंग एडिटिंगमुळे आजचे युवक कसे फसवले जातात व त्यावर काय काळजी घेतली पाहिजे हे सादर करण्यात आले . हर्षल सोनार व श्रुती विसपुते यांनी या नाटिके बाबत सुरुवातीला माहिती दिली. यामध्ये वैभव पाटील, स्नेहल शीनकर, डिंपल चव्हाण, साक्षी पंचारिया, गणेश पाटील यांनी सादरीकरण केले दुसरी नाटिका ही फेक वेबसाईट वरून ऑनलाइन शॉपिंग केल्यामुळे कशी फसवणूक होते यावर दिव्या बच्छाव, लिमया पाटील, हर्षदा पाटील, गणेश पाटील यांनी सादरीकरण केले. तिसरी नाटिका ही ऑनलाइन गेम्स मुळे होणारे आर्थिक फसवणूक यावर जान्हवी वाणी, जयश्री देसले, संजना देसले, साक्षी देवरे, जानवी वाघ, जयेश गोरे, श्रेया विसपुते, दिनेश सोनवणे, पूर्वा पंचारिया यांनी सहभाग नोंदवला.सायबर सेलचे पोलीस कॉन्स्टेबल श्री दिलीप वसावे व श्री अमितेश पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.सायबर सेलचे पोलीस कॉन्स्टेबल श्री दिलीप वसावे यांनी धुळे शहरात झालेल्या विविध सायबर गुन्ह्यांची उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना जागृत केले तसेच सायबर योद्धांनी जी सायबर जागृती मोहीम राबवली आहे त्याबद्दल त्यांचे मनापासून कौतुक केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. एम व्ही पाटील सर यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत जागृत राहून समाजालाही जागृत करण्याचे आवाहन केले या कार्यक्रमाचे आयोजन तसेच प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार कार्यक्रमाच्या संयोजक डॉ. स्वाती बोरसे यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. के. एम. बोरसे, संगणक शास्त्र विभागाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. या उपक्रमाबाबत धुळे ग्रामीणचे आमदार व संस्थेचे चेअरमन मा. कुणालबाबा पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष मा. डॉ. एस.टी. पाटील , प्राचार्य मा. डॉ. एम. व्ही. पाटील उपप्राचार्य प्रा. के. एम. बोरसे , कार्यालयीन अधीक्षक श्री. मुकेश पाटील यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.







## महागाव तालुक्यात होऊ द्या